(SJIF) Impact Factor-8.575
ISSN-2278-9308
ISSUE No- (CCCXVIII) 348


# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

May -2022

## 'Role of Social Sciences in Contemporary Society'




Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

Prof. Sujata Awati
Editor
The New Miraj Education Society's
Kanya Mahavidyalaya, Miraj

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, 348(CCCXLIX) B
ISSN : 2278-9308
May, 2022

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांचे योगदान — लेफ्ट. डॉ. अर्चना टाक | 1 |
| 2 | स्वातंत्र्याची ७५ वर्ष — सहा. प्रा. अस्मिता संजय कोडग | 4 |
| 3 | 'हॅन्डबॉल खेळाडूंच्या वेग या घटकावर टायर प्रशिक्षणाचा होणारा परिणाम: एक अभ्यास' — प्रा. बाबासाहेब म्हाळू सरगर ,डॉ. सुनिल दत्तात्रय चव्हाण | 7 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय सुरक्षेबाबतचे विचार — प्रा. बाबासाहेब शात्रू पाटील | 12 |
| 5 | प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतरच्या तंदुरुस्तीसाठी विशेष परिस्थितींमध्ये व्यायामाचे नियम आणि व्यायामाची पद्धत. — डॉ.भारत राजाराम चालसे | 14 |
| 6 | आदिवासींचे सण व उत्सव — भोई रविंद्र रतिलाल | 19 |
| 7 | सामाजिक समस्या, लिंगभाव आणि समाज — प्रा. बिजली श्रीपाल दडपे | 22 |
| 8 | राजर्षि शाहूंची कोल्हापूर संस्थानातील कामगार विषयक भूमिका — प्रा. डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे | 25 |
| 9 | लिंग,लिंगभाव आणि हिंसाचार — दिपाली शंकर वाघमारे | 29 |
| 10 | छत्रपती शाहू महाराज यांचा सामाजिक न्यायाचा विचार डॉ. अण्णासाहेब हरदारे | 33 |
| 11 | समकालीन समाज आणि संत साहित्यातील सामाजिक विज्ञान — डॉ. चंदशेखर आत्माराम भगत | 36 |
| 12 | शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरणातील योगदान — डॉ. गौतम नामदेव ढाले | 40 |
| 13 | सामाजिक चळवळींचा चिकित्सक अभ्यास — प्रा. डॉ. गंगाधर बालू चव्हाण | 44 |
| 14 | शिक्षण व शारीरिक शिक्षणाची कोरोना काळातील भूमिका — डॅा.महादेव सुखदेव सुर्यवंशी | 47 |
| 15 | कोविड–१९ चा भारतीय उद्योगांवरील परिणाम डॉ.तेजस्विनी बी. मुडेकर | 51 |
| 16 | महिलांच्या सर्वांगीण विकासात क्रीडा व शारीरिक शिक्षणाची भूमिका :एक अभ्यास — डॉ. प्रिया प्रकाश टेळे | 55 |
| 17 | गुणग्राहक राजा छत्रपती शाहू महाराज — डॉ रामदास वैद्य | 60 |
| 18 | जातीव्यवस्था व अस्पृश्यता – डॉ. बाबासाहेब आंबेडकर — डॉ. सुरेवाड संजय गंगाराम | 63 |

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 348 (CCCXLIX ) B
ISSN : 2278-9308
May, 2022

# छत्रपती शाहू महाराज यांचा सामाजिक न्यायाचा विचार

डॉ. अण्णासाहेब हरदारे
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज

**प्रस्तावना :**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात गरिबांना न्याय मिळावा, त्यांना माणूस म्हणून जगता यावे, यासाठी आरक्षणाचे धोरण राबविले. तत्कालीन समाजव्यवस्थेने गरीबी विषयक त्यांचे विवेचन महत्वपूर्ण आहे. ब्राह्मण वर्गाने सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेची समाजातील मक्तेदारी आपल्याकडेच कशी राहील यासाठी प्रयत्न केले हाते. ब्राह्मण वर्गाने समाजातील जो अशिक्षित व भोळा समाज होता, त्यांच्यापासून ज्ञान कसे दूर राहील याचाच प्रयत्न केला होता. याची जाणीव ठेवूनच राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात अनेक क्रांतिकारी कायदे केले. तसेच आपल्या संस्थानात सक्तीचे मोफत शिक्षण सुरू करून मागासवर्गीय आणि दलितांची मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी कसून प्रयत्न केले.

**उद्दिष्टे :**

१.सामाजिक न्यायाची संकल्पनाचा अभ्यास करणे.
२.सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी शाहू महाराजांची भूमिका अभ्यासणे.
३.शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे .
४.शाहू महाराज यांच्या सामाजिक कार्यासाठी केलेल्या कायद्यांचा आभ्यास करणे

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधन पेपरसाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून त्यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम साधनाचा वापर केला आहे. विश्वकोश ,संदर्भग्रंथ ,विविध विचारवंतांची पुस्तके इत्यादी साधनांचा वापर केला आहे .

**विषय विवेचन :**

**सामाजिक न्यायाची संकल्पना :**

न्यायाची संकल्पना प्राचीन काळात राजकीय चिंतनाचा मुख्य भाग राहिलेली आहे. परंतु, काळाच्या ओघात न्यायाच्या संकल्पनेत आमूलाग्र बदल झालेला आहे. समाज व्यक्तीपासून ज्या अपेक्षा करतो त्या व्यक्ती पूर्णकरीत असेल तर त्यास न्यायी व्यक्ती म्हटले जात होते. त्यामध्ये आता आमूलाग्र बदल झालेला आहे. आता न्यायपूर्ण समाजवर अधिक भर दिला जातो. न्यायी समाज कसा निर्माण केला जाईल, हाच मुख्य विचार न्यायाच्या बाबतीत केला जातो. आधुनिक विचारवंत समाजाची स्थिती "जैसे थे"च्या बाजूने नाहीत तर ते समाजात परिवर्तन करू इच्छितात.

सामाजिक न्यायाची संकल्पना ही मुख्यतः समाजातील सर्व व्यक्ती, धर्म, वंश, जात, रंग किंवा पंत हा फरक न करता समान आहेत, या तत्त्वावर मुख्यत: आधारित आहे. समाजात विशेषाधिकार असलेल्या वर्गाचा अभाव (कमतरता) म्हणजे सामाजिक न्याय. न्यायमूती गजेंद्रगडकर म्हणतात, "सर्व असमानतेचे उच्चाटन करणे आणि सामाजिक त्याचबरोबर आर्थिक व्यवहारामध्ये सर्व नागरिकांना समान संधी प्रदान करणे हा सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा उद्देश आहे." तसेचसामाजिक न्यायाची संकल्पना नेहमीच साधनांचे असमान वाटप व साधनसामग्रीचा तुटवडा यावरच अवलंबून असते. या दोन बाबी सामाजिक न्याय संकल्पनेच्या आधारभूत आहेत. वितरणाचे तत्त्व

सामाजिक न्यायाच्या दृष्टीने श्रेष्ठ असले तरी ते पुरेसे नाही. वितरणाच्या तत्त्वाप्रमाणे सर्वांना समान संधी मिळू शकते. परंतु, केवळ समान संधी उपलब्ध करून देऊन सामाजिक न्याय मिळेलच असे नाही. समान संधीबरोबरच लाभाच्या तत्त्वांची सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी आवश्यकता असते. महात्मा ज्योतिबा फुलेंच्या काळात सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक व्यापक होत गेली. महात्मा ज्योतिबा फुलेंनंतर पश्चिम महाराष्ट्रातील राजर्षी शाहू महाराज सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत आघाडीवर होते. ब्रिटिश सरकारच्या अधिपत्याखाली राहूनही राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक स्तरावर क्रांतिकारक योजना आखून त्यांची प्रतिकल सामाजिक परिस्थितीमध्ये कठोरपणे अंमलबजावणी केली.

**सामाजिक न्याय व शाहू महाराज :**

शाहू महाराजांनी राज्यकारभाराचे उद्दिष्ट स्पष्ट केले होते. "आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हितसंबंधाची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे." (लठ्ठे, (१९२५) : ७४,७५) त्या दृष्टीने सामजिक न्यायची प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी आपल्या राज्यकारभारापासून सुरुवात केली. यासाठी त्यांनी संस्थानच्या राज्य प्रशासनावर संख्येने अल्पसंख्य असलेल्या तथाकथित ब्राह्मणांची मक्तेदारी जास्त असून विविध जातींचे लोक असणे आवश्यक असल्याचा मत व्यक्त करून त्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले आणि सदस्य नेमण्याचे सुरुवात केली. यामध्ये त्यांनी प्रशासनातील अल्पसंख्याक ब्राह्मण उच्चवर्णीयांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी शिक्षणप्रसार व बहुजन समाजातील साक्षरांना संस्थांच्या सेवेत प्राधान्य देण्याचे शाहू महाराजांनी ठरविले. बहुजन समाजाला ज्ञान व सत्ता या दोन्हींचा योग्य वाटा दिल्याशिवाय सामाजिक न्याय निर्माण होणार नाही. म्हणून त्यांनी १४ एप्रिल १८९४ रोजी म्हणजे अधिकार ग्रहणानंतर 'हुजूर ऑफिस नावाचे नवीन सचिवालय सुरू केले. त्याचे 'हुजूर चिटणीस' किंवा मुख्य सचिव म्हणून शाहू महाराजांचे देशी शिक्षक श्री. रघुनाथराव सबनीस यांची नेमणूक केली. सबनिसांना या वरिष्ठ जागी नेमू नये यासाठी कोल्हापूरच्या ब्राह्मणांनी खूप प्रयत्न केले. परंतु त्यात त्यांना यश आले नाही.

शाहू महाराजांनी कारभार सुरु केल्यावर अनेक रिक्त जागा निर्माण झाल्या होत्या या जागा भरण्याच्या दृष्टीने त्यांनी संस्थानातील त्यांनी ब्राह्मण वर्गातील लोकांच्या नेमणूक न करता शिकलेल्या गुणी मराठा, कायस्थ, जैन, लिंगायत या ब्राह्मणेत्तर तरूणांच्या नेमणुका करण्यास सुरूवात केली यात मराठा समाजाचे भारस्करराव जाधव यांची महसूल अधिकारी नेमणूक केली. ज्या योगी प्रशासनातील ब्राह्मणांची मक्तेदारी कमी होऊन ब्राह्मणेत्तरांची संख्या मोठया प्रमाणात वाढत गेली.

२६ जुलै, १९०२ रोजी मागासलेल्या लोकांसाठी केलेला ५०% आरक्षणाचा कायदा होय. हा जाहीरनामा म्हणजे माणसाला माणूस म्हणून सन्मानाने जगता आले पाहिजे यासाठी केलेला प्रयत्न होता. राजषी शाहू महाराजांची आरक्षणविषयक भूमिका व प्रतिगाम्यांचा विरोध :राजर्षी शाहू महाराजांनी जन्मभर बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न पाहिले. ते साकार करण्यासाठी सर्वस्व पणाला लावले. स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे नव्हे, हे ओळखून प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. वसतिगृहे स्थापन केली. बहुजन समाजाला विद्वान करून त्यांची अस्मिता जागृत केली. जाती-जातींतील विषमता दूर करून सर्व व्यवहार समानतेच्या पायावर उभे केले. यातून सामाजिक न्यायाची पायाभरणी त्यांनी केली.

समीक न्यायाच्या प्रस्थापित करण्याच्या संघर्षात शाहूमहाराज यांनी वेदोक्त प्रकरणानंतर आपल्या सामान्य, अज्ञानी, अशिक्षित प्रजेला शिक्षण आणि ज्ञान मिळाल्याखेरीज ही प्रजा सामाजिक विषमतेच्या गर्तेतून बाहेर येणार नाही हा विचार छ. शाहूंच्या मनात रुजला. या विचारातून ब्राह्मणेत्तरांना शैक्षणिक सोयी उपलब्ध करून देणे,

खेड्यापाड्यातील गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना कमी खर्चामध्ये राहण्या-जेवण्याच्या सोयी उपलब्ध करून देणे हा विचार बळावला. त्यांनी विद्यार्थी वसतीगृहांची अभिनव मोहीम सुरू करून सर्वांगीण प्रगतीचा पाया घातला.

सामाजिक परिवर्तनाचे माध्यम, प्रशासकीय सुधारणेपूर्वीची आवश्यक बाब म्हणून छत्रपती शाहूंनी आजच्या महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाला फार मोठे योगदान दिले आहे. त्यांनी शैक्षणिक सुविधांची बहुजन वर्गासाठी तरतूद केली. तसेच शुद्र वर्णाची ब्राह्मण वर्चस्वाच्या दास्यातून मुक्तता करणे, पीडित शेतकरी वर्गाची सामाजिक आणि आर्थिक सुधारणा करणे, वर्णव्यवस्थेला विरोध आणि त्यांचे निर्मूलन करणे,वर्णव्यवस्थेवर श्रद्धा ठेवणाऱ्या ब्राह्मणी विचारसरणीवर प्रहार करणे, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रांमध्ये सुधारणा घडवून आणणे असे अनेक कार्य त्यांनी केले.

सारांश :

राजर्षी शाहू महाराजांनी मागासवर्गीयांच्या विकासासाठी राजषी शाहूंनी स्वीकारलेले सामाजिक न्यायाचे तत्व त्यातूनच त्यांनी अंगिकारलेले शैक्षणिक दृष्टिकोन, आरक्षणाचे धोरण, मागासवर्गीयांच्या सामाजिक, आर्थिक वब शैक्षणिक सक्षमिकरणाच्या दृष्टिने महत्त्वपर्ण असे आहे. घटनेतहत आरक्षणाचे तत्त्व स्वीकारलेले असले तरी आरक्षण भरले जात नाही ही बाब आजच्या कालखंडात दिसून येते. परंतु राजषी शाहूंनी आरक्षणाच्या दृष्टिने उचललेली पावले व त्याची प्रत्यक्ष केलेली अमलबजावणी ही बाब सामाजिक न्यायाच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण आहे. शिक्षणांतर्गत शिक्षणापासून वंचित घटक जसे: अस्पृश्य समजल्या गेलेल्या जाती, आधिकदृष्ट्या मागास घटक, स्त्रियांचे विद्यावेतन आणि शिष्यवृत्तीच्या माध्यमातून दिलेले प्रोत्साहन व त्यांचा घडवून आणलेला शैक्षणिक उत्कर्ष ही बाब आजच्या कालखंडाशी तुलना करता महत्त्वपूर्ण स्वरूपाची वाटते.

संदर्भ सूची :

१.प्रा. चौथाईवाले सुरेश, "शाहू महाराजांचे आरक्षणाचे धोरण व सद्यःस्थिती," केलास पब्लिकेशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, जानेवारी, २०००

२.आ. साळुंखे पी.बी. : "राजषी शाहू गोरव ग्रंथ," शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई,

३.न्या. सावंत पी.बी. : "राजर्षी शाहू महाराजांचे जीवित कार्य," राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, संपादक-जयसिंगराब पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर,

४.नरके हरी : दे. सकाळ, ३ मार्च, २००६

५.प्रा. पानसे रमेश : दै.लोकसत्ता, १५ जानेवारी, २००७,

६.डॉ. फडके य.दि. : "महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या दिशा", श्री. विद्या प्रकाशन, पुणे